# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

---

**दिनांक २६.०८.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २५.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण ७५६/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,४५९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६६,८००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २५.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २६.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **११** ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) वाडी पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचे ०२ गुन्हे उघडकीस.**

पोलीस ठाणे वाडी हद्दीत, वार्ड नं. १, दवलामेटी, वाडी येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. यशोदा मनोहर पाटील, वय ४६ वर्षे यांचा कॅटरींगचा व्यवसाय आहे. त्यांचे घराशेजारी राहणारे ठेकेदार नामे कुंवरसिंग राणा यांनी त्यांचे लेबर यांना राहण्यासाठी फिर्यादीचे घरातील एक खोली मागीतली होती. फिर्यादीने त्यांना रूमची चाबी दिली होती. तेथे राणा यांचा लेबर नामे १) राधेशाम बस्ताराम कोहरे, वय ४५ वर्षे, रा. दधीया, वाराशिवनी, जि. बालाघाट, (मध्यप्रदेश) हा राहत होता. दिनांक २३.०८.२०२६ चे १३.३० वा. चे पुर्वी किरायाने राहणारा राधेशाम याने फिर्यादीचे दुसऱ्या रूममध्ये ठेवलेले त्यांचे कॅटरींगचे खानावळीचे सामान चोरून नेले. फिर्यादी यांनी त्यास विचारणा केली असता, त्याने नमुद सामान वडधामना येथे एका ईसमास विक्री केल्याचे सांगीतले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान वाडी पोलीसांनी आरोपी राधेशाम बस्ताराम कोहरे यास अटक करून, त्याने गुन्ह्यातील विक्री केलेला मुद्देमाल अल्युमिनीयम चे मोठे १३ गंज, झाकण्या, कुकर असा एकुण ५८,०००/—रू. चा मुददेमाल आरोपी क्र. २) सरफराज ईनायतुल्ला सवारे, वय २३ वर्षे, रा. खैरी पन्नासे, वार्ड क्र. १, हिंगणा, जि. नागपुर याचे ताब्यातुन जप्त केला आहे.

आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने मार्च महीन्यात खडगांव रोड वरील माऊली नगर, येथील कदम बार जवळील आफरीन ट्रेडर्स हार्डवेअर दुकानाचा कोंडा तोडुन हार्डवेअरचे सामान चोरी केले व ते चालत्या—फिरत्या कबाडीवाल्यास विकल्याचे सांगीतले. अभिलेख तपासला असता, पो. ठाणे वाडी येथे

दिनांक १८.०३.२०२६ रोजी कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन एकुण २ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन मगर, सपोनि. कुणाल धुरट, पोहवा. नागेश्वर दासरवार, विजय वायदुडे, राहुल नागदेवे, चंद्रकुमार टेकाम, पोअं. दिलीप बाजड यांनी केली.




**<u>३) कोराडी पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २५.०८.२०२६ चे २०.०० वा. ते २१.०० वा. चे दरम्यान, कोराडी पोलीसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत जयभिम नगर, महादुला येथे राहणारा ईसम हा त्याचे राहते घरी अंमली पदार्थ गांजा विक्री करीत आहे. अशा माहीतीवरून घटनास्थळी पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, तेथे एक ईसम त्याचे हातातील थैली टाकुन पळुन गेला होता. तेथे हजर महीलेस तीचे नाव पत्ता विचारले असता तीने तीचे नाव सौ. रेखा लल्ला सोनेकर असे सांगीतले. व पळुन गेलेला ईसम तीचा पती कांबळी उर्फ लल्ला सुखदेव सोनेकर, वय ४६ वर्षे असे असल्याचे सांगीतले. पंचासमक्ष कापडी पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये अंमली पदार्थ गांजा वजनी १.०२७ ग्रॅम मिळुन आल्याने किंमती ५१,३५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगुन असल्याचे दिसुन आले. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब), **11**(अ) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कोराडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), नागपुर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. सत्यविर बंडीवार सहा. पोलीस आयुक्त (जरिपटका विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. गणेश धुमाळ, पोउपनि. तुषार नवले, पोहवा. चंद्रशेखर बुरघाटे, निरंजन, पोअं. दिपक भारती, संजय जाधव, प्रशांत ढोक, बबन व मपोअं. शितल गुट्टे यांनी केली.

**<u>४) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— शस्त्र बाळगुन धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २५.०८.२०२६ चे २०.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या माहीतीवरून टि.व्ही. टॉवर चौक ते भिमटेकडी मस्जीद, गिट्टीखदान रोडवर येथे गेले असता, तेथे एक इसम हातात शस्त्र घेवुन आरडा—ओरड करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आकाश शिवकुमार गुप्ता, वय २३ वर्षे, रा. मरीयम नगर, सिव्हील लाईन, सिताबर्डी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती ३००/—रू. चा मिळून आल्याने जप्त

करण्यात आला. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्याचे विरूध्द पोलीस ठाणे सिताबर्डी, गिट्टीखदान, ईमामवाडा येथे शरीराविरूध्दचे गंभीर गुन्हे व एनडीपिएस ॲक्ट नुसार गुन्हे दाखल असुन तो पोलीस ठाणे ईमामवाडा येथील एनडीपिएस चे गुन्ह्यात पाहीजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्त गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, मपोनि. शुभांगी देशमुख, सपोनि. चेतन बोरखेडे, पोउपनि. मनोज राऊत, पोहवा. महेंद्र सडमाके, पोअं. संदीप पांडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे यशोधरानगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २५.०८.२०२६ चे ०८.०० वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत प्लॉट क्र. ०७, रमाबाई बुध्द विहार जवळ, कांजीहाऊस चौक, नागपूर येथे राहणारे फिर्यादी समीर अहमद मुश्ताक अहमद, वय ५१ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नांदुरा येथे नातेवाइकाकडे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ६०,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,४५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि. सुरेश बुंदे ८९९९६९४०१३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सदर :—** दिनांक २५.०८.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सदर हद्दीत, लोकभवन गेट क्र. १ समोरील, सदर उड्डाणपुलाचे पिल्लरखाली रोड दुभाजकावर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतक हा परीसरात भिक्षा मागुन आपला उदरनिर्वाह करीत असल्याचे समजले. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सदर येथे संपर्क साधावा.

यापकरणी फिर्यादी सरतर्फे पोहवा. दिलीप ठाकरे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सदर येथे सपोनि. दिगांबर राठोड यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३२४०९५७ /२००३ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | राजसिंग मोहनसिंग चौव्हाण, रा. यशवंत स्टेडीयम झोपडपट्टी, धंतोली, नागपुर. | ०५.०९.२०२६ |
| २. | मा. १३ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०१३३६/ २००८ | कलम ४५४, ३८० भा.दं. वि. | राकेश डि. शर्मा, वय ४० वर्षे, रा. मीनीमाता नगर, विठ्ठल गेंद्रे चे घरी किरायाने, कळमना, नागपुर. | ०५.०९.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**